**कविता**

# नीलिमा रवि

**असंही एक ॲनिमल फार्म**
**अर्थात् आजचं प्राणीजगत**

१.

**कासव**

कासवाला माहीत आहे, आता शर्यत शक्य नाही
तेव्हा सशाचा आजा झोपला न् हरला...
आता सतत अव्वल धावत रहातो ससा
आताशा पराभव जणू माहीतच नाही त्याला!

आताशा विन-विन सशांच्या स्पर्धेत
भाग घेणं कधीच सोडलय कासवाने
शांत लयीतली संथ चाल, बस्स केवळ
स्वस्थ नि दीर्घ जगण्यासाठी जणू...

आपल खाणं, आपल पीणं, सावकाश चालणं
उपजीविकेसाठी आपल्याच लयीत,
कुठे कुणी मस्तवाल आलं तर
घ्यावं अंग आकसून, लपावं आपल्याच कवचाआड

वाटे, नको कुणाच्या अध्यात मध्यात
हात लावाल, तर जाईन बचाव्याच्या पवित्र्यात
ना अपव्यय शक्तीचा, ना तोरा वरचष्म्याचा
हाच तर मंत्र नसेल, त्याच्या दीर्घायुचा?

शेषनागाने पृथ्वी तोलली, याचा केवढा डंका
विराजमान झाला होता तो, कासवाच्याच पाठीवर!
नाही हे का, कुणाच्या खिजगणतीत?
सामान्यत्व स्वीकारून मोकळं झालंय का कासव?

तू कासवच ना? की, लोकशाहीतील सामान्य माणूस?
अस्मानी सुल्तानीचे वार होऊ द्यात कितीही
वाकेन, नमेन, पण मोडून पडणार नाही!
असा बाणा कुणाचा? कासवाचा? की, सामन्यांचा?
समूहाने राहू, समूहाने जगू
भीती वाटेल, तेव्हा समूह-गाणी गाऊ
समूहचं बनवेल, आपले नीतीनियम, कुणाच गाणं हे?
समुहच असेल न, आपलं अस्सल-अभेद्य कवच?

२.

**खार**

राजेशाही अस्ताला गेली..
उगवत्या लोकशाहीतील तिचं स्थान
तिला समजलचं नाही बहुधा
ते कौतुकभरे पट्टे
नव्हे, पाठीवरचे बोटांचे ठसे
रामराजांची कृपा समजतेय का ती?

काय मेला विसरभोळेपणा माझा?
कुठे पुरून ठेवल्या मी त्या बिया?
विसरूनच जाते ती
गेल्या निवडणुकीत
मिळालेल्या आश्वासनांगत
भुलत राहते नवनवीन गाजरांना!

आताशा कौतुकाच्या पट्ट्या
सांभाळणंही कठीण होऊन बसलंय
फुलांच्या जागी रंगीत पानं
बोन्सायची खुरटलेली मुळं
बिन-वृक्षांच्या शोभिवंत बागेत
शोधतेय का ती आपली जागा?

इथे तर आता धाडधाड
घाव बसताहेत बुंध्यांवर
आपल्या कच्च्याबच्च्यांना
आसरा देण्यासाठी
नेताशाहीतल्या राजांकडे
आशाळभूतपणे याचना करते आहे का ती?

हरवत चाललेलं अस्सल जगणं
संपतय बेसुमार जंगलतोडीने
'आहे रे'वाल्यांचा शिळ्या कढीला
ऊत आणणारा संस्कृतीवाद पोट भरू शकेल?
राष्ट्रवादाच्या झंझावातात 'नाहीरे'वाल्यांचं अस्तित्व
मिटलं तर नाही जाणार? हेच का ते 'सुदिन'? हं?

३.

**मांजर**

मांजरीचं जगणं बिकट झालंय का आजकाल?
उलट्या मतलबी वाऱ्यांच्या कचाट्यात सापडलीये का
ती?

उंदीर पकडीत येतच नाहीयेत आजकाल तिच्या
चलनवाढीने फुगले आहेत का ते?

दुधालाही तोंड लावत नाही ती आजकाल
इंधनवाढीने आटलंय का ते?

घरात सहज शिरता येत नाहीये तिला आजकाल
मांजरीच्या पावलाने अनिष्ट बदल घडलेयत का काही
एवढ्यात?

प्रवेश निषिद्ध आहे तिला आजकाल कुठेकुठे
आडवी गेली तर... उगाच अपशकुन नको, म्हणतात
का ते?

जातपात, राष्ट्रवादाचे नवे-करकरीत तट जागोजागी,
हं... कान लावू जराऽ,
वाटे तिला, चिणलेल्या माणुसकीच्या किंचाळ्यांनी
कंपत नाहीत का हे?

सोन्याच्या मांजरांची रास पडतेय देवळात आजकाल,
जित्या मांजरींना बळी दिल्याचं प्रायश्चित्त का ते हे?

घेतले आहेत तिने आजकाल ध्यान केल्यागत डोळे
मिटून
मनातली खळबळ लपवण्याचा अन्य मार्ग कोणता
भला?

हं... नखही परजत असते ती आजकाल! अंतिम
तडाख्याचा विचार?

सहनशक्तीच्या कडेलोटाचं लक्षण? हो? नाही?

४.

**मुंगी**

एके काळी
मुंगीला पंख होते म्हणे!
ती खरंच उडाली होती का आकाशात
सूर्याला गिळायला?

एके काळी
रंगावरूनच ओळखता यायची म्हणे तिची प्रकृती
लाल ती डसणारी- काळी ती न डसणारी
एवढी ओळख पुरे होती का तिला तेव्हा?

पुढे कोणे एके काळी...
हत्तीच्या कानात शिरली म्हणे, एक मुंगी!
तेव्हापासून म्हणे, हत्तीला नामोहरम करणारी ती मीच ती!
'ग'ची बाधा झाली का मग, प्रत्येक वारुळाला?

त्याच काळात की काय,
वारूळांनी उभे केले आपापले सवतेसुभे?
प्रत्येक वारूळाचे आपापले कठोर कायदेकानून
वारूळ भिडलं होतं का आपापल्या अस्मितेला?

आताच्या काळी..
वंशवृद्धी हेच ध्येय झालय म्हणे,
पंख विहरत जगण्याचं स्वातंत्र्यच
नाकारलं जातंय का नराला?

आताच्या काळी..
कामकरी मुंग्या संरक्षित घरं लिपताहेत म्हणे
नव्या जीवांबरोबरच जोपासताहेत का त्या
स्वतःतील निर्विकारतेला नि असंवेदनशीलतेला?

आताच्या काळी..
राणीमुंग्या भराभर अंडी घालताहेत म्हणे
निगुतीने पोसले जात आहेत का एकांगी विचार
लाव्हर्यांमधील? उच्चतमतेचा टेंभा मिरवायला

आताच्या काळी..
फौजी मुंग्यांचा कडक पहारा असतो म्हणे
स्वतंत्र विचार निघृणतेने निपटत
जागवताहेत का त्या आपापला वारूळवाद ?

आताच्या काळी...
आकाशी उडायचं स्वप्न मुंगी विसरली आहे का?
यंत्रवत आदेशांचं पालन करता करता
आठवतील का तिला कधी... मुक्ताईचे बोल?

**नीलिमा रवि**